**<u>रे.मु.नं.१५७/२०१४</u>**

## आदेश निशाणी क्र.२८ वरील

१. प्रस्तूतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२, नियम ४ प्रमाणे प्रतिवादींचे वारस अभिलेखावर घेणेसाठी वादींनी केलेला आहे.

२. वादी सांगतात, दावा वाटप व निरंतराचे ताकीदीसाठी आहे. यातील प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी हजर होवून दाव्यास कैफियत दिलेली आहे. यातील प्रतिवादी क्र.१ मच्छिंद्र मारुती ओहोळ हे दिनांक ०४.०४.२०१५ रोजी मयत झाले आहेत. परंतु त्या प्रतिवादींचे वारस प्रस्तुत दाव्यात वादी व प्रतिवादी म्हणून आदीपासून समाविष्ठ आहेत. त्यामुळे सदर प्रतिवादी क्र.१ यांचे स्वतंत्रपणे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे नाही. केवळ प्रतिवादी क्र.१ यांचे नावापुढे सरनाम्यात तशी नोंद होणे गरजेचे आहे. वादी पुढे सांगतात, यातील प्रतिवादी क्र.३ यांच्या मृत्यू दाखल्यावरुन पांडूरंग मच्छींद्र ओहोळ हे दिनांक ०४.०१.२०१६ रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे सदर प्रतिवादी क्र.३ यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. दावा गुणदोषावर चालणेसाठी मयत प्रतिवादी क्र.३ यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. म्हणून हा अर्ज.

३. यातील प्रतिवादी क्र.१ ते ३ व ७ व ८ यांनी त्यांचे म्हणणे देवून अर्जातील सर्व कथने नाकारली आहेत. ते पुढे सांगतात, अर्जात नमूद केलेले कारण योग्य नाही. तसेच प्रतिवादी क्र.१ यांचे मृत्यूपश्चात दाव्याचे कारण त्यांचे वारसांना येत नाही. शेवटी या प्रतिवादींनी अर्ज नामंजूर करण्याची मागणी केली आहे.

४. प्रतिवादी क्र. १ ते ३ व ७ व ८ यांचे विधिज्ञ व वादी यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुतचा दावा सरस निरस मानाने वाटप, पृथक कब्जा व जाहीरीकरणाकरिता आहे. प्रस्तुत अर्जाने वादींनी प्रतिवादी क्र.३ यांचे वारस अभिलेखावर

घेणेस परवानगी मागितली आहे. यातील प्रतिवादी क्र. ३ हे दिनांक ०४.०१.२०१६ रोजी मयत झाले आहेत, या अनुषंगाने मृत्यू प्रमाणपत्राची प्रत दाखल केली आहे. प्रतिवादी क्र.३ मयत झाले ती तारीख व प्रस्तुतचा अर्ज दाखल तारीख पाहता अनुषंगिक तरतुदीनुसार सदरचा अर्ज कायदेशीर मुदतीमध्ये केलेला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्र.३ यांचे मृत्यूपश्चात दाव्याबाबतचा हक्क व अधिकार त्यांचे वारसांना प्राप्त होतो व वारस या नात्याने ते दावा पुढे चालवू शकतात. त्यामुळे अर्ज मुदतीत आहे व वारसांना दाव्याचा हक्क प्राप्त होत आहे. या दोन्ही गोष्टींची पूर्तता झालेली आहे, त्यामुळे वादींना प्रतिवादी क्र.३ यांचे वारस अभिलेखावर घेण्याची परवानगी देणे योग्य आहे.

६. सबब, अंतिम न्यायाच्या दृष्टीने वादीचा अर्ज निशाणी क्र. २८ मंजूर केला. प्रतिवादी क्र. १ हे त्यांच्या नावापुढील नोंदीबाबत व प्रतिवादी क्र.३ यांचे वारस अभिलेखावर घेण्यास परवानगी दिली. वादींनी प्रस्तुत परवानगीच्या अनुषंगाने योग्य ती पुर्तता पुढील तारखेस करावी.

दिनांक : १४/१२/२०१६. (कु.एल.एच.जाधव)

२रे सह दिवाणी न्यायाधीश,क.स्तर, मोहोळ

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of this PDF file Order /Judgment are same word to word, as per the original Order /Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. M. Algundgi |
| Court | : | 2nd Civil Judge Jr. Division & J. M. F. C. Mohol. |
| Date | : | 14/12/2016 |
| Judgment /order signed by the Presiding Officer on | : | 14/12/2016 |
| Judgment/order uploaded on | : | 15/12/2016 |